# महिला परिक्षार्थी उमेदवरांसाठी महत्वाची सूचना दि.13/06/2024

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेतील ए. एन. एम. , ग्रामसेवक पदासाठी ऑनलाईन परीक्षा 13 ते २१ जून, 2024 रोजी होणार आहे, छायाचित्र ओळखपत्रासंदर्भात (photo ID) ही एक महत्त्वाची सूचना आहे.

ऑनलाईन परीक्षेसाठी तुम्हाला मूळ फोटो आयडी पुरावा आणि त्याच आयडी पुराव्याचा झेरोक्स आणावा लागेल,असे सर्व परीक्षार्थींना सूचित करण्यात येत आहे.

**वैध ओळखपत्र** :- पॅन कार्ड/पासपोर्ट/कायमस्वरुपी वाहन चालविण्याचा परवाना/छायाचित्रासह मतदार कार्ड/छायाचित्रासह बँक पासबुक/मान्यताप्राप्त महाविद्यालय/विद्यापीठाने जारी केलेले वैध अलीकडील ओळखपत्र/आधार कार्ड/छायाचित्रासह ई-आधार कार्ड/छायाचित्रासह बार कौन्सिल ओळखपत्र.

कृपया नोंद घ्या-रेशन कार्ड आणि लर्नर ड्रायव्हिंग लायसन्स या उद्देशासाठी वैध ओळखपत्र म्हणून स्वीकारले जाणार नाहीत.

तसेच, लक्षात घ्या की कॉल लेटरवर दिसणारे तुमचे नाव (नोंदणी प्रक्रियेदरम्यान तुम्ही दिलेले) फोटो ओळखपत्रावर दिसणाऱ्या नावाशी तंतोतंत जुळले पाहिजे. ज्या महिला उमेदवारांनी लग्नानंतर पहिले/मध्यम/आडनाव बदलले आहे, त्यांनी याची विशेष नोंद घेतली पाहिजे.कॉल लेटर आणि फोटो ओळखपत्रात दर्शविलेल्या नावांमध्ये काही विसंगती असल्यास तुम्हाला परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे, त्यांनी मूळ राजपत्र अधिसूचना/त्यांचे विवाह प्रमाणपत्र मूळ स्वरूपात सादर केले तरच त्यांना परवानगी दिली जाईल.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर